दैनिक साहसिक
सोमवार
२६ ऑगस्ट २०१९

# रशीद खान पठाण यांच्या तक्रारींवर देशद्रोही पी. चिदंबरम व ॲड. फली नरिमन विरुद्ध कारवाई

## काँग्रेसची आज ठिकठिकाणी महापर्दाफाश सभा



*प्रतिनिधी / २५ ऑगस्ट*

**वर्धा :** भाजपच्या महाजनादेश यात्रेची पोलखोल करण्याकरीता काँग्रेसच्या वतीने आज ठिकठिकाणी महापर्दाफाश सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाजनादेश यात्रेच्या माध्यमातून ठिकठिकाणी सभा घेऊन खोटारडेपणाचा जो कळस गाठला आहे. त्या खोटारडेपणाचा पर्दाफाश करुन जनतेला सत्य परिस्थिती अवगत करण्याच्या दृष्टीकोनातून माजी खासदार नाना पटोले यांच्या नेतृत्वात महापर्दाफाश सभांचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या-ज्या ठिकाणी मुख्यमंत्र्याच्या सभा झाल्यात त्या-त्या ठिकाणी या महापर्दाफाश सभांतून महाजनादेश यात्रेची पोलखोल केल्या जाणार आहे. जिल्ह्यात आज सोमवारला महापर्दाफाश सभा दुपारी ४ वाजता आर्वी येथील गांधी चौकात त्यानंतर सायंकाळी ५ वाजता पुलगाव येथील लक्ष्मी सेलीब्रेशन लॉनमध्ये तर रात्री ८ वाजता नालवाडी येथील अनुसुया मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

(उर्वरित पान २ वर)



गृहमंत्री अमित शाह



ॲड. निलेश ओझा
राष्ट्रीय अध्यक्ष : इंडियन बार असोसिएशन



रशीद खान पठाण
मानव अधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय सचिव



आरोपी : ॲड.पी. चिदंबरम



आरोपी : ॲड. फली नरीमन

*प्रतिनिधी/ २५ ऑगस्ट*

**मुंबई :** जे. एन. यू प्रकरणात देशाविरुद्ध व भारतीय सेनेविरुद्ध नारेबाजी करणाऱ्या देशद्रोही लोकांना मदत करण्यासाठी पी. चिदंबरम यांनी दै. इंडियन एक्सप्रेसमध्ये एक लेख प्रकाशीत करून भारतीय सेनेचे मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न केला होता. भारत देशाविरुद्ध पाकिस्तानी सैन्याला मदत करण्याकरिता नारेबाजी करणे, भारतीय सेना मुर्दाबाद म्हणणे म्हणजे देशद्रोह होत नाही असे चिदंबरम,ॲड. फली नरिमन व इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी दैनिक वृत्तपत्राचे म्हणणे होते. दि.१६ फेब्रुवारी २०१६ रोजी तो वादग्रस्त लेख प्रकाशित केला होता.

त्याबाबत दिल्ली न्यायालयाने दि. ३ मार्च २०१९ रोजीच्या आदेशात कन्हैया कुमारच्या जामिन अर्जावर स्पष्ट नमूद केले की हा देशद्रोह आहे. परंतु तरीसुद्धा पी. चिदंबरम व ॲड. फली नरिमन या देशद्रोही वकिलांनी व इंडियन एक्सप्रेसने भारतीयांची,भारतीय सेनेची माफी मागितली नाही. याउलट पुन्हा ३ वर्षांनी दि.१४ जानेवारी २०१९ रोजी देशद्रोही लोकांचे समर्थन करणारा लेख प्रकाशित केला.

भारतीय साक्षीपुरावा अधिनियमचे कलम १० आणि भा.दं.वि.चे कलम १२०(ब) नुसार देशद्रोही आरोपींना मदत करण्याकरिता लेख, पत्रक प्रकाशित करणारा व्यक्ती सुद्धा देशद्रोहाचा आरोपी असतो व भा.दं.वि.१२४(अ)नुसार आजीवन कारावासाच्या शिक्षेस पात्र असतो.

या संदर्भात मानव अधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय सचिव रशीद खान पठाण व इंडियन बार असोसिएशनने दि. १९ फेब्रुवारी, २०१९ रोजी लेखी तक्रार दाखल करून दोषीवर कठोर कारवाईची मागणी केली होती. रशीद खान पठाण यांच्या पत्राची दखल घेत बार कौन्सिल ऑफ इंडिया ने दि.१६ एप्रिल २०१९ रोजी दिल्ली बार कौन्सिलला पत्र जा.क्र. BCLD/2153/2019 (D.C.Misc.) नुसार आदेश देत पी. चिदंबरम व ॲड. फली नरिमन यांच्याविरुद्ध चौकशी व कारवाईचे आदेश दिले होते.

रशीद खान पठाण यांनी त्याच्या १९ फेब्रुवारी २०१९ च्या पत्रात सर्वोच्च न्यायालयाचे "सीबीआय विरुद्ध अनिल शर्मा (१९९७) ७ SCC १८७'' या प्रकरणाचा उल्लेख करून पी. चिदंबरम यांचा अटकपूर्व जामीन रद्द करून सी. बी. आय कोठडी देणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. विशेष बाब म्हणजे दिल्ली उच्च न्यायालयाने दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी चे आदेशात त्याच कायद्याचा आधार घेत पी. चिदंबरम यांचा जामीन रद्द केला आणि चिदंबरम यांना सीबीआयने अटक करून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली. आता लवकरच पी. चिदम्बरम आणि ॲड. फली नरिमन यांच्याविरुद्ध राजद्रोहाचे कलम भा.दं.वि.१२४-अ तसेच कोर्ट अवमानना कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. तसेच या तक्रारीची प्रतीलीपी गृहमंत्री अमित शहा यांना पाठविण्यात आली आहे.

रशीद खान पठाण यांचे वकील व इंडियन बार असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. निलेश ओझा यांनी याबाबत माहिती दिली.

## स्वातंत्र्य सैनिक गणेश वाजपेयी यांचा राष्ट्रपतीच्या हस्ते सत्कार



*प्रतिनिधी / २५ ऑगस्ट*

**वर्धा :** येथील स्वातंत्र्य सैनिक गणेश बागेश्वरप्रसाद वाजपेयी यांचा क्रांतीदिनी दि. ९ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात राष्ट्रपतीच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गोवा मुक्ती आंदोलनात गोवा मुक्ती संग्राममध्ये दि. १५ ऑगस्ट १९५५ ला गणेश वाजपेयी हे सहभागी झाले होते. दि. ९ ऑगस्ट क्रांतीदिनी राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात स्वातंत्र्य सैनिक गणेश वाजपेयी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू व पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रामुख्याने उपस्थित होते. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व पंतप्रधानानी यावेळी उपस्थितीत स्वातंत्र्य सैनिकांसोबत वार्तालाप करीत फोटो सुद्धा काढलेत. हा कार्यक्रम राष्ट्रपती भवनात संपन्न झाला.

## पोळ्याच्या पाडव्याला ग्रामपंचायत निवडणूका; मतदानाच्या टक्केवारीवर होणार परिणाम

* मतदारांना मतदान केंद्रावर आणण्याचे उमेदवारांसमोर उभे ठाकले आव्हान
* निवडणूक आयोगाच्या आंधळेपणामुळे प्रशासनाची नंदीबैलाप्रमाणे अवस्था
* पाडव्यामुळे शांतता व सुव्यवस्थेकरीता पोलिसांची अग्निपरीक्षा

*ता. प्रतिनिधी / २५ ऑगस्ट*

**सेलू :** तालुक्यातील आकोली, नवरगांव व गिरोली (ढगे) या तीन ग्रामपंचायतच्या सार्वत्रिक निवडणूका ऐन पाडव्याच्याच दिवशी असल्याने निवडणूक विभागासह पोलीस प्रशासनासमोर निवडणूक शांततेत पार पाडण्याचे आव्हान असणार आहे, तर दुसरीकडे पाडव्यामुळे मतदाराना मतदान केंद्रावर आणण्यासाठी उमेदवारांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. एकंदरीतच निवडणूक आयोगाच्या आंधळेपणामुळे मतदानाच्या टक्केवारीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तालुक्यातील आकोली, नवरगांव व गिरोली (ढगे) ग्रामपंचायतची सार्वत्रिक निवडणूक शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी होवू घातली आहे. याच दिवशी पोळ्याचा पाडवा असल्याने मतदार गावात जरी राहणार असले तरी मतदानासाठी मतदान केंद्रावर येणार का..? हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे मतदारांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी उमेदवारांची चांगलीच दमछाक होणार असल्याचे दिसते.

पोळ्याच्या पाडव्याला ग्रामीण भागात एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रावण मासाच्या समाप्तीनंतर जिभेचे चोचले पुरविणाऱ्यांसाठी पोळ्याचा पाडवा हा एक पर्वणीच असतो. जिल्ह्यात दारुबंदी असली तरी पाडवा म्हणजे केवळ खाण्या-पिण्याचा दिवस म्हणून पाळला जातो. दुसरीकडे याच दिवशी नंदीपोळा असल्याने आबालवृद्ध चिमुकल्यांना घेऊन नंदीपोळ्याचा आनंद घेतात तसेच बहुतेकजण सिंदी रेल्वे येथील प्रसिद्ध तान्हा पोळा देखील बघायला जातात.

निवडणूक आयोगाने मुंबईत बसून पाडव्याच्या दिवशी ग्रामपंचायत निवडणुकीची तारीख घोषित केल्याने आपला आंधळेपणा तर दर्शविला शिवाय प्रशासनाला सुद्धा अडचणीत आणले आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे संबंधित सगळ्यांचीच तारांबळ उडणार आहे. मात्र निवडणूक आयोगाला त्याच्याशी काही देणे-घेणे नाही. बैलपोळ्याच्या दिवशी निवडणूक पथक संबंधित गावात दाखल होणार नेमके त्याचवेळी गावात बैलपोळ्याचा उत्साह असणार. बेवड्यांचा उच्छाद वेगळाच..!

पोळ्याच्या काळात ग्रामीण भागात वातावरण कसे असते याची परिपूर्ण कल्पना पोलीस विभागाला आहे. मात्र त्यांच्याही अडचणीत वाढ करण्याचेच काम निवडणूक आयोगाने करून ठेवले आहे. एकंदरीतच निवडणूक आयोगाच्या या आंधळेपणामुळे निवडणूक कर्मचाऱ्यांसह पोलीस प्रशासनाची तारांबळ उडणार असून मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम झाला तर उमेदवारांचीही डोकेदुखी वाढणार आहे. कारण ग्रामपंचायत निवडणूकीत एक मत म्हणजे काय असते याचा अनुभव अनेकदा दिसून आला आहे.

## चमडीखोर पत्रकार 'अशपाक खान'वर विनय भंगाचा गुन्हा दाखल



हाच तो महिलांवर वाईट नजर ठेवणारा चमडीखोर पत्रकार अशपाक खान

* वार्डातील तक्रारकर्ता महिलेला आरोपी पत्रकार अश्पाक खान हा मागील काही महिन्यांपासून सतत इशारे करून करीत होता महिलेची छेडखानी.
* अश्पाकच्या वाईट नजरेमुळे वार्डातील आजू -बाजूच्या महिलांनी दाराला व बाथरूमच्या खिडक्याला लावले परदे
* अश्पाकच्या वाईट नजरेमुळे महिला स्व:ताला करीत होत्या घरात बंदीस्त
* आपल्या कृष्णकृत्यामुळे अश्पाक होता वार्डात बदनाम.
* अश्पाक खानला विनयभंगाच्या आरोपाखाली अटक

*रफिक खान/ २५ ऑगस्ट*

~~**पांढरकवडा :** येथिल एका वृत्तपत्राचा~~ तालुका प्रतिनिधी अश्पाक खान याने वार्डातील एका महिलेचा विनयभंग केल्यामुळे फिर्यादी महिलेने पांढरकवडा पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी पत्रकार अश्पाक खानवर भादंवी कलम ३५४(३),५०४,५०६ नुसार विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला असून आज त्याला अटक करण्यात आली

महिलेचा विनयभंग करणाऱ्या चमडीखोर आरोपी पत्रकार अश्पाक खान (वय ४५) रा.नेहरू वार्ड, पांढरकवडा याच्या घराशेजारी राहणाऱ्या वार्डातील एका महिलेने आज दिनांक २५ ऑगस्ट रोजी अश्पाक खान पत्रकाराने तिचा विनयभंग केल्याची तक्रार पांढरकवडा पोलिस स्टेशन येथे दाखल केली.

सदर चमडीखोर पत्रकार हा मागील काही महिन्यांपासून फिर्यादी महिलेचा पाठलाग करणे,अश्लील हातवारे करणे, डोळ्याने इशारे करणे तसेच महिलेला आपली वासना शमविण्याची सतत मागणी करीत होता. काही महिन्यांपूर्वीच सदर प्रकाराबाबत फिर्यादी व तिच्या पतिने आरोपीच्या पत्नीला आरोपीकडून सतत होणाऱ्या त्रासाची माहिती दिली होती. त्यावेळी या चमडीखोर पत्रकाराने जाहिर माफी मागितल्याने सदर प्रकरण शांत झाले होते. परंतु चमडीखोर पत्रकाराच्या वासनेची भूक त्याला स्वस्थ बसू देत नव्हती.

आज रविवार दि. २५ रोजी सदर महिला सकाळी ९ वाजता घराच्या गच्चीवर गेला असता समोरच्या गच्चीवरून या चमडीखोर निर्लज्ज अश्पाक याने तिलाअश्लील हातवारे करून तिचा मोबाईल नंबर सुद्धा मागितला. त्यावेळी सदर महिलेने याबाबत त्याला टोकले असता त्याने आपली गुर्मी दाखवत **'मी पत्रकार आहे, माझे कोणीही काही वाकडे करू शकत नाही'** अशी महिलेला धमकी दिली.

सदर पत्रकाराच्या वासनांधतेमुळे संपूर्ण वार्ड परिसरातील महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वार्डातील सर्व महिलांनी घरादाराच्या, बाथरूमच्या खिडक्यांना परदे लावून बंद केले आहे. आज जेंव्हा पोलीस सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता वार्डात गेले असता अनेक महिलांनी आपले नांव न सांगता या चमडीखोर पत्रकाराचे विविध कारनामे पोलीसांसमोर कथन केले.

विशेष म्हणजे सदर पत्रकाराचे कारनामे सध्या शहरात चर्चेचा विषय ठरला असून अश्पाक खान हा पत्रकार असल्याचा फायदा घेतनेहमीच अवैध व्यावसायिकांकडून, अधिकाऱ्यांकडून खोटे-नाटे कार्यक्रम असल्याचे सांगून व रमजान ईद, बकरी ईदच्या नावाने वसुली करणे हे नित्याचेच कार्यक्रम झाले होते. पत्रकार अश्पाक खान याच्या रमजान ईद व बकरी ईदच्यावसुलीमुळे शहरातील मुस्लिम समाजाला शरमेने मान खाली घालावी लागत असल्याची चर्चा सध्या शहरात दबक्या आवाजात सुरू आहे.

अशा लिंग पिसाट व चमडीखोर पत्रकारावर पोलिसांनी योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक वार्डातील नागरिकांकडून केली जात आहे.

## प्रलंबित मागण्यांसाठी मराठा समाज पुन्हा रस्त्यावर? मागण्यांवर तोडगा न काढल्यास आज मंत्रालयावर धडक मोर्चा




*विशेष प्रतिनिधी / २५ ऑगस्ट*

**ठाणे :** मराठा क्रांती ठोक मोर्चाने मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे. मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांवर सरकारने तोडगा न काढल्यामुळे सोमवारी २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मराठा समाज पुन्हा एकदा धडक मोर्चा काढणार आहे. मराठा क्रांती ठोक मोर्चाचे आबासाहेब पाटील यांनी ही माहिती दिली.

सीएसएमटीवरून मंत्रालयापर्यंत मोर्चा काढणार असल्याची माहिती मराठा क्रांती ठोक मोर्चाने दिली आहे. दोन दिवसात सरकारने निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला. सरकारने निर्णय दिला, पण प्रशासनातील अधिकारी न्याय देत नाहीत, असा आरोप मराठा क्रांती ठोक मोर्चाने केला. मोर्चा अडवल्यास ठिय्या आंदोलन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**मराठ समाजाच्या मागण्या?**

* आंदोलन काळातील सरसकट सर्व गुन्हे मागे घ्यावे.
* २०१४ च्या विद्यार्थ्यांना तात्काळ नियुक्त्या देण्यात याव्यात.
* ७२ हजार मेगा भरतीतील विद्यार्थ्यांना तात्काळ नियुक्त्या द्याव्या.
* एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना तात्काळ नियुक्त्या द्याव्या.
* सारथी प्रशिक्षण संस्था मराठ्यांसाठी समिती द्यावी
* अण्णासाहेब पाटील महामंडळच्या सुलभ कर्ज योजना तात्काळ करा.
* शेतकऱ्यांना पीकविमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करा.
* नरेंद्र पाटील यांना ताबडतोब निलंबित करा किंवा महामंडळ बरखास्त करा.

## बहुजन विकास आघाडीला मोठा धक्का, आमदार विलास तरेंचा शिवसेनेत प्रवेश



*विशेष प्रतिनिधी / २५ ऑगस्ट*

**मुंबई :** बहुजन विकास आघाडीचे आमदार विलास तरेंनी आज आपल्या हातात शिवबंधन बांधत शिवसेनेत प्रवेश केला. ते मागील दोन टर्म बोईसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते. यावेळी त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांनी देखील शिवसेनेची वाट धरली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी तरे यांच्या हातात शिवबंधन बांधले आणि भगवा झेंडा दिला. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित होते. शिवसेनेत येर्णाय़ांसाठी आम्ही काही टार्गेट ठेवलेलं नाही. अजून कोण कोण येणार हे लवकरच कळेल, असं सुचक विधान उद्धव ठाकरे यांनी यावेळी केलं. उद्धव ठाकरे म्हणाले, शिवसेना आणि भाजप एकत्रच लढणार आहे. मी, मुख्यमंत्री आणि अमित शाह लवकरच जागावाटप करणार आहे. चांगले काम करण्यासाठी सहकारी मिळत आहेत त्यांचं आम्ही स्वागत करत आहे.

## वाडीत मध्यरात्री फुटवेअरच्या दुकानाला आग

### आगीत लाखोंचे साहित्य जळून खाक



*प्रतिनिधी/ २५ ऑगस्ट*

**वाडी :** येथिल नगरपरिषद हद्दीत अमरावती महामार्गालगत असलेल्या प्लाट नं. ३, शॉप नं. ३/४ दत्तवाडी येथील इरफान वल्द जबीउल्ला खान यांच्या मालकीचे एस.के.फुटवेअर नामक दुकान आहे. त्यांचा दुकानामध्ये रीनोवेशनचे काम सुरू होते. ते नेहमी प्रमाणे रात्री११:३० च्या दरम्यान दुकान बंद करून घरी गेले असता अचानक त्यांच्या दुकानातुन रात्री २:३० वाजता धुर निघताना दिसला. बाजुलाच वास्तव्य करणारे सामजिक कार्यकर्ते पुरुषोत्तम रागीट यांच्या हि बाब लक्षात येताच त्यांनी दुकानाच्या फलकावर असलेल्या मोबाईल फोनवर संपर्क साधून घटनेची माहिती दिली असता मालक इरफान खान तात्काळ दुकानात दाखल झाले. त्यांनी याची माहिती त्वरीत वाडी अग्निशमन विभागास कळविली. वाडी नगर परिषदेचे जुम्मा प्यारेवाले यांचे मार्गदर्शनात अग्निशमन अधिकारी रोहीत शेलारेसह अग्निशमन विभाग कर्मचारी अनुराग पाटील,आनंद शेंडे, वैभव कोळस्कर, नितेश वघारे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आगीवर पाण्याचा जबर मारा करून आग आटोक्यात आणली. दुकानास शार्ट सर्कीट मुळे आग लागल्याची माहिती प्राथमिक तपासात पुढे येत आहे.

या आगीत टेबल, चेअर, फुटवेयरचे संपूर्ण साहित्य व किराणा सामान जळून खाक झाले. जवळपास ३ ते ४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला.सुदैवाने बाजुच्या दुकानाला आग लागली नसून आगीत कोणतीही जिवीत हानी झाली नाही.

दै.साहसिक हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक रवींद्र नरहरिपंत कोटंबकार,मुद्रक-निरज त्रिपाठी यांनी जनसंग्राम ऑफसेट प्रिंटर्स, आर.टी.रोड गोंडप्लॉट वर्धा येथे मुद्रित करून दै.साहसिक कार्यालय, राधे कॉम्प्लेक्स, अकोला अर्बन बँकेच्यावर, सोशालिस्ट चौक, वर्धा येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी: (07152) 242498, dsahasik@gmail.com RNI NO. MAHMAR / 2007 / 24829 - Postage- WDA / 42 / 08 -10 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.(कुठलाही वाद वर्धा न्यायालयांतर्गत बाध्य राहील.)